Cosmos Multidisciplinary Research E-Journal | Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal | Impact Factor 5.69 | ISSN No. 2456-1665

# ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील बदलत्या सेवा आणि सुविधा

**प्राजक्ता भागाजीराव सुसर**
संशोधक विद्यार्थिनी

**सारांश :**

आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयाची भूमिका मोलाची आणि बदलती आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रगतीमुळे ग्रंथालयाला सुद्धा देत असलेल्या सेवामध्ये परिस्थितीनुसार बदल करणे क्रमप्राप्त आहे. आजच्या वाचकाला हवी असणारी माहिती ग्रंथालयात उपलब्ध नसलयास तत्काळ इंटरनेटच्या माध्यमातून हवी ती माहिती कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध होऊ शकेल व ती तात्काळ पूरविण्याची जबाबदारी ग्रंथालयावर येऊन पडली आहे. म्हणून आज माहितीच्या विस्फोटात माहितीचे महत्वही वाढलेले आहे. या लेखामध्ये ग्रंथालयातील बदलत्या सेवा याचा अभ्यास करणार आहोत.

***संज्ञा :*** *ग्रंथालय, ग्रंथालयातील सेवा, ई-स्त्रोत*

**प्रस्तावना :**

ग्रंथालय म्हणजे सर्वसाधारणपणे सर्व प्रकारचे छापील साहित्य तसेच हस्तलिखित माहिती साधने एकत्रितपणे ठेवण्याची जागा होय. वाचक, वाचन साहित्य आणि कर्मचारी हे ग्रंथालयाचे तीन घटक आहेत. ग्रंथालयाचा मूळ उद्देश्य माहिती संग्रह करुन वाचकांना ज्ञान देणे हा असतो. सध्या डिजिटल आणि माहिती तंत्रज्ञानाच्या काळात दृकश्राव्य माध्यमेही ग्रंथालयामध्ये दिसून येतात. नवीन ग्रंथालयाचे स्वरूप संगणकीय झालेले आहे. तंत्रज्ञानामुळे आजघडीला छापील वाचन साहित्यासोबत इलेक्ट्रॉनिक वाचन साहित्याची उपलब्धता वाढली आहे. नवीन ग्रंथालये संगणकीय होत आहेत. आंतरजालावरून माहितीचा शोध घेणे शक्य आहे. आज संपूर्ण जगामध्ये डिजिटल ग्रंथालय ही संकल्पना आलेली आहे. डिजिटल ग्रंथालयाच्या साहाय्याने वाचकांना एकसारखे ग्रंथ जगभरात एकाच वेळी वाचता येणे शक्य झाले आहे. एवढेच नाही तर कुणालाही त्या ग्रंथालयाचे सदस्य म्हणू नोंद करुन हव्या त्या पद्धतीची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. आज माहिती प्रसारणाच्या क्षेत्रामध्ये मोठे बदल झाल्यामुळे त्या दृष्टीने ग्रंथालये ही वेगळ्या पद्धतीने विकसित होत आहेत.

**माहिती तंत्रज्ञान :**

माहिती तंत्रज्ञान म्हणजे योग्य अशी माहिती इंटरनेटच्या माध्यमाने पोहचवणे ही भारतातील सर्वात मोठी अशी औद्योगिक क्रांती आहे. एकविसावे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. आंतरजालावर माहितीचा साठा विपूल प्रमाणात आपणास उपलब्ध आहे.

**व्याख्या :**

ग्रंथालय आणि माहिती केंद्रात माहितीची निर्मिती, संप्रेक्षण, प्रसार, विपणन व पुनर्प्राप्ती व प्रक्रिया करताना ज्या वेगवेगळ्या नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जातो त्यास माहिती तंत्रज्ञान असे म्हणतात.

ग्रंथालयाचे परंपरागत रूप आता बदलले आहे. ग्रंथालये आता नवीन युगात माहिती केंद्रे म्हणून ओळखली जातात. माहितीच्या उगमापासून उपयोजकापर्यंतचा तिचा प्रवास अतिशय जलदगतीने होत आहे.

ग्रंथालयात संगणकाच्या वापराने आणि माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोजनाने अलिकडच्या काळात ग्रंथालयामध्ये अनेक पद्धती अस्तित्वात आल्या असून आधुनिक ग्रंथालये अस्तित्वात आली. १९७० च्या दशकात लॅंकस्टरने 'पेपरलेस' लायब्ररीचे भाकीत केले होते. ते भाकीत आज खरे ठरत आहे. त्याचा परिपाक म्हणून Hybrid Library, Virtual Library, Media Library उदयास आली आहे आणि सरतेशेवटी डिजिटल लायब्ररी ही संकल्पना रुजू झाली आहे.

डिजिटल ग्रंथालयामध्ये डिजिटल ऑडिओ-व्हिडिओ तुकडे (Clips) किंवा पूर्ण स्वरुपातील डिजिटल माध्यमात परावर्तीत चित्रपट. अज्ञावलीचे (Software) ग्रंथालय, असे नव्या स्वरूपातील ग्रंथालयाचा आपण दैनंदिन जीवनात वापर करीत आहोत. इंटरनेट वरील उपलब्ध माहिती साठविणे, हस्तांतरित करणे व शोधणे ही कामे पूर्वीपेक्षा जलद गतीने होऊ लागली. इंटरनेट वरील उपलब्ध माहिती म्हणजे ई रिसोर्सेस होय. यात माहिती ही ० ते १ या संगणकाच्या बायनरी भाषेत साठवली जाते. अशा साधणाची हाताळणी, जतन, संरक्षण, देवघेव इ. व्यवस्थापन ग्रंथपालाना करणे आवश्यक आहे.

**ग्रंथालयातील आधुनिकीकरण :**

एकविसावे शतक हे माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे शतक समजले जाते आणि ग्रंथालये ही उच्च शिक्षण क्षेत्रातील मूलभूत घटक मानली जातात. आजच्या परिस्थितीत ग्रंथालयाच्या कार्यामध्ये व्यापक प्रमाणात वाढ झाली आहे. अशावेळी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील सर्व घटक जसे - विद्यार्थी, अध्यापक तसेच इतर घटक यांना माहिती ज्ञान तसेच इतर वाचन साहित्य उपलब्ध करुन देण्याचे कार्य ग्रंथालयाकडून करण्यात येते. अशाप्रकारे कठीण कार्य तत्काळ पार पाडण्यासाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर उपयुक्त ठरत आहे. माहिती प्रेक्षेपित करण्यासाठी, साठविण्यासाठी प्रदर्शित करण्यासाठी किंवा तीची देवाण-घेवाण करण्यासाठी वापरली जाणारी विद्युत उपकरणे म्हणजे माहिती संप्रेषण तंत्रज्ञान होय.

माहिती संप्रेषण तंत्रज्ञानामध्ये रेडिओ, आकाशवाणी दुरदर्शन व्हिडिओ, टेप रेकॉर्डर, इलेक्ट्रॉनिक साहित्य, दूरध्वनी, मोबाईल, दूर परिषद, ई-मेल, डीव्हीडी, प्रोजेक्टर अशा बाबींचा समावेश होतो. माहिती ज्ञान तसेच वाचन साहित्य उपरोक्त बाबीच्या वापरातून त्वरीत हव्या त्या ठिकाणी उपलब्ध केले जाऊ शकते. यामुळे ग्रंथालयात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर दिवसेंदिवस वाढतच आहे नव्हे ती एक गरज बनली आहे.

**ग्रंथालयीन सेवा :**

**उपार्जन सेवा :**

ग्रंथालयात उपार्जन कामात इंटरनेट तंत्रज्ञानाचे महत्व ग्रंथालयात उपार्जन प्रक्रियेमध्ये नवीन ग्रंथा, प्रकाशनासंबंधी माहिती, ग्रंथाची उपलब्धता, त्यांची किंमत, त्यांचे वितरक तसेच ग्रंथ खरेदीसाठी माहिती वारंवार उपयोगी पडत असते. परदेशी प्रकाशित ग्रंथाबद्दल याची गरज असते.

**२) देवघेव कामामध्ये इंटरनेटचे महत्त्व :**

देवघेव कामामध्ये इंटरनेट तंत्रज्ञानाचा वापर करून आंतरग्रंथालयीन Interlibrary Loan साठी करता येते. असलेल्या ग्रंथ व ग्रंथेत्तर साहित्याची उपलब्धता इतर स्थानिक व संबंधित ग्रंथालयावरून उपलब्ध संकेत स्थळाचा उपयाेग करुन शोधता येतो व आवश्यक असणारी माहिती पत्रे, ई मेलच्या द्वारे पाठवून आंतर ग्रंथालीयन पद्धतीचा वापर खूप चांगल्या प्रकारे वाचकास होऊ शकतो.

**३) प्रचलित जागरूकता सेवा :**

या सेवेद्वारा ग्रंथालय प्रत्येक देशांची व प्रदेशांची प्रचलित घडामोडी संशोधकांना तसेच वाचकांना उपलब्ध करून देत असतो. यात वर्तमानपत्र, साप्ताहिक, दिन विशेषांक इ. स्वरूपाच्या वाचनसाहित्याद्वारे ही सेवा प्रभावीरित्या संशोधकांना / वाचकांना दिली जाते.

**निवडक माहितीचे प्रसारण :**

या सेवेद्वारे ग्रंथालय संशोधकांच्या अध्ययनाचा विषय, व्यापक स्वरूपाची माहिती इ. बाबी आणिा ग्रंथालयात उपलब्ध असणारी माहिती यांची योग्य सांगड घालून आवश्यक ती विश्लेषणात्मक माहिती वाचकाच्या गरजेनुसार उपलब्ध करुन दिली आहे.

**ऑनलाई सेवा :**

यामध्ये ईमेल सेवा पासून ई-प्रकाशन, ई-वर्तमानपत्रे इ. सर्व इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचन साहित्याची देवाण-घेवाण ग्रंथालयातून दिली जाते. या सेवेचे वैशिष्टे म्हणजे जागेची कमतरता ते वेळची तत्परता या सर्वाचे समाधानकारक नियोजन केले जाते.

**भाषांतर सेवा :**

परदेशी भाषेचे ज्ञान असणारे अथवा अभ्यासक्रमाशी निगडित देशाच्या या प्रदेशाच्या स्थानिक भाषेचे ज्ञान असणारे तज्ञ जर केंद्रात असतील तर भाषांतर सेवा देणे शक्य होऊ शकते.

**ई-स्त्रोत :**

**संसाधने :**

या तंत्रामुळे कमी जागेत रूप मोठी माहिती संग्रहित करणे शक्य आहे. यामुळे आता ग्रंथ नियतकालिके, प्रबंध, शब्दाकोश, ज्ञानकोश, डेटाबेस इत्यादी सारखे संदर्भग्रंथ ही डिजिटल स्वरूपात साठविले जात असून आता ते डिजिटल स्वरूपात उपलब्ध आहेत.

**ई-बुक्स :**

मुद्रण पूर्व काळात ग्रंथ हस्तलिखित स्वरूपात उपलब्ध होते. पुढे मुद्रणकलेच्या शोधामुळे ग्रंथमुद्रित स्वरूपात उपलब्ध होऊ लागले. आता तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे मुद्रित ग्रंथाला इलेक्ट्रॉनिक बुक्सने आव्हान निर्माण केले आहे. ई-बुक्समध्ये माहिती इलेक्ट्रॉनिक किंवा डिजीटल स्वरूपात उपलब्ध केली जाते. ई-बुक्स संगणकाच्या पडद्यावर वाचता येतात तसेच मोबाईल व त्यासारख्या साधनांच्या पडद्यावरही वाचता येतात.

ई-बुक्समुळे वाचकांचे जग पूर्णपणे बदलले आहे. बहुतेक प्रकाशनकांनी त्यांचे ग्रंथ मुद्रित व ई-बुक्सच्या स्वरूपात उपलब्ध करून दिलेले आहे. ई-बुक्स निर्मितीमध्ये दोन प्रवाह आढळतात. एक म्हणजे मुद्रित ग्रंथाचे डिजिटलायझेशन करणे व दुसरा म्हणजे ग्रंथ इलेक्ट्रॉनिक स्वरूपातच तयार करणे. या प्रकाराला 'बॉर्न डिजिटल' ग्रंथ असे म्हणतात.

**ई-जर्नल्स :**

गरजू संशोधकांपर्यंत अद्ययावत संशोधनात्मक माहिती पोहचविण्यासाठी जर्नल (नियतकालिके) हे माध्यम वापरले जाते. मुद्रित नियतकालिके ही संशोधनात्मक माहिती संप्रेषणाचे वेगवान माध्यम आहे. ई जर्नल्स हे मुद्रित नियतकालिकांच्या मानाने अधिक फायदेशीर ठरत आहे. ई जर्नल्सच्या विविध अंकातील लेख, लेखक हे विशिष्ट संज्ञाचा वापर करुन शोधता येतात व गरजेनुसार अभ्यासता येतात.

**ई-डेटाबेस :**

ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक लायब्ररी कॅटलॉग कार्डद्वारे ग्रंथालयातील वाचन साहित्याची माहिती वाचकांना उपलब्ध करुन देण्यात येते. यास ओपॅक (OPAC) online public Access catalouge असेही म्हणतात. इंटरनेटवरील तालिका उपलब्ध करुन दिल्यास वाचक जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यातून वाचन साहित्याची माहिती मिळवू शकतो. या इंटरनेटवरील ओपॅकला वेब ओपॅक असे म्हणतात.

**ई-वर्तमानपत्र :**

सध्या अनेक वर्तमानपत्रे इलेक्ट्रानिक स्वरूपात उपलब्ध असून इंटरनेटद्वारे मोफत स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

**ब्लॉग्ज व विकिपिडीया :**

ब्लॉग ही इंटरनेटवरील बेवसाईटच असते. व्यक्ती व संस्था त्यांच्याकडील अद्ययावत, नवीन माहिती, ज्ञान, संदेश, विचार प्रसारित करण्यासाठी ब्लॉगचा वापर करतात ब्लॉग हे अतिशय उपयुक्त असे माहिती साधन आहे. कारण त्यामधून अद्ययावत माहिती उपलब्ध होते. एखाद्या तज्ञाची, शास्त्रज्ञाची, विचारवंताची नवीन संशोधन, नवीन  विचार, याबाबत त्वरित माहिती मिळते, संस्थेच्या बाबतीतही नवीन धोरणे, उत्पादने, सेवा इ. बाबतची माहिती उपलब्ध होत असते.

विकिपिडीया हे एक सामूहिक माहिती निर्मितीचे उत्तम उदाहरण आहे. इंटरनेटवरील तो एक ज्ञानकोश आहे. विकिपिडीयात जगातील कोणतीही व्यक्ती तिच्याकडे असणारा नवीन मजकूर विकिपिडीयात समाविष्ट करण्याआधी योग्य त्या प्री रिव्ह्यू मार्फत संबंधित मजकूराची अचुकता, विश्वासार्हता तपासली जाते. त्यानंतर तो विकिपिडीयात समाविष्ट केले जाते.

**गुगल इमेजेस :**

इलेक्ट्रॉनिक माहिती साधनामधील आणखी एक महत्त्वाचे साधन म्हणजे गुगल इमेजेस या वेबसाईटवर विविध विषयासंबंधीचे फोटो, नकाशे, चित्रे, उपलब्ध आहेत. अध्ययन अध्यापनासाठी विद्यार्थी व शिक्षकांना गुगल इमेजेस वरील माहितीचा खूप उपयोग होतो.

**समारोप :**

संगणक आणि इंटरनेट या माध्यमांनी मानवी जीवनात बदल झालेला आहे. ज्ञानाच्या कक्षा विस्तारलेल्या आहेत. माहिती तंत्रज्ञानामुळे ज्ञान साधनामध्ये खूपच विविधता झाली असून केवळ इलेक्ट्रॉनिक स्वरूपातच ज्ञान साहित्य उपलब्ध होण्याची शक्यता वाढलेली आहे. नव्याने प्रकाशित होणारे अनेक ग्रंथ आता ई बुक्स स्वरूपातच प्रकाशित होत आहेत. मोठ्या प्रमाणात निर्माण होणारे इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचनसाहित्य आणि असे वाचन साहित्य सामान्य वाचकांपर्यंत सहजपणे उपलब्ध करुन देणारी डिजिटल ग्रंथालये (इंटरनेट) एकमेकांशी जोडलेली असतात. या ग्रंथालयातील

सेवा पारंपारिक ग्रंथालयापेक्षा अचक, स्पष्ट व प्रभावी असतात. म्हणून या माहिती युगाला डिजिटल ग्रंथालयाच्या माध्यमाने वाचकांना एक नवे क्षितिज उपलब्ध झाले आहे.

**संदर्भ :**

१. Kumar P.S.G, Computerisation Indian Libraries : Delhi, B. R. Publication, 1987
२. फडके द. ना., ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, तिसरी आवृत्ती, पुणे युनिव्हर्सल प्रकाशन, २००८
३. फडके द. ना., अनुदित ग्रंथेतर साहित्य, नाशिक य. च. म. मुक्त विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती केंद्र
४. संपा. वरखेडे रमेश, ज्ञानगंगोत्री, जून-जुलै-ऑगस्ट २००९, नाशिक य. म. यू. विद्यापीठ
५. सुतार, डी. बी., ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, द्वितीय आवृत्ती, कोल्हापूर, स्नेहा ध. सुतार, २०१३
६. प्रा. एस. बी. पाटील (जुन-जुलै २००८), डिजिटल लायब्ररी : एक नवे क्षितिज नाशिक, ज्ञानगंगोत्री, ३-९